।। सा विद्या या विमुक्तये ।।

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपूरी, नांदेड . 431606 (महाराष्ट्र)

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

"Dnyanteeerth", Vishnupuri, Nanded – 431606 (Maharashtra)

Establishment on 17th September 1994 – Recognized by theUGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'B + +' Grade

Phone: (02492) 229242/43
Fax : (02462) 229574

ACADEMIC (AFFILIATION) SECTION

Website: srtmun.ac.in
e-mail: affiliation@srtmun.ac.in


शैक्षणिक वर्ष २०२७–२०२८ करिता
संलग्नीकरणाचे नुतनीकरण प्रस्ताव सादर न
केलेल्या महाविद्यालयांसाठी मुदत वाढ देणे बाबत.

## महत्वाचे परिपत्रक

संदर्भ : ०१)विभागाचे परिपत्रक क्र. शैक्षणिक संलग्न–०३/२०२६–२७/४९० दि. ३१/०७/२०२६.
०२)विभागाचे परिपत्रक क्र. शैक्षणिक संलग्न –०३/२०२६–२७/५३१ दि. २१/०९/२०२६.
०३)विभागाचे परिपत्रक क्र. शैक्षणिक संलग्न –०३/२०२६–२७/५६२ दि. ०६/१०/२०२६

प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२७–२०२८ साठी महाविद्यालयांचे तात्पुरते कायम संलग्नीकरण, तुकडी, नैसर्गिक वाढ, संशोधन केंद्र यांचे नुतनीकरणाचे प्रस्ताव हे ऑनलाईन ई–समर्थ संगणकीय प्रणालीद्वारे ३०/०९/२०२६ पर्यंत महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ११४ नुसार सादर करणे बाबत संदर्भीय परीपत्रक ०१ व ०२ अन्वये कळविण्यात आलेले होते.

तथापी, वरील संदर्भीय ०१ व ०२ परीपत्रकाद्वारे कळवुन सुध्दा अनेक महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्ष २०२७–२०२८ साठी महाविद्यालयाचे नुतनीकरणाचे प्रस्ताव ई–समर्थ या संगणकीय प्रणालीद्वारे विहीत मुदतीत सादर केलेले नाहीत.

संदर्भीय क्र.०३ परीपत्रकानुसार संलग्नीकरणाचे नुतनीकरण प्रस्ताव सादर न केलेल्या महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थेचे अध्यक्ष/सचिव यांची बैठक मा. कुलगुरू महोदय यांचे अध्यक्षतेखाली व मा. प्र. कुलगुरू महोदयांच्या प्रमुख उपस्थितीत दि. ०८/१०/२०२६ रोजी संपन्न झाली. या बैठकीमध्ये उपस्थित महाविद्यालय संस्थेचे प्रतिनिधी, प्राचार्य यांनी केलेल्या विनंतीनुसार मा. कुलगुरू महोदयांच्या मान्यतेने ज्या महाविद्यालयांनी शै. वर्ष २०२७–२०२८ करिता संलग्नीकरण नुतनीकरणाचे प्रस्ताव विहीत मुदतीत सादर केलेले नाहीत अशा महाविद्यालयांना दि. १५/१०/२०२६ पर्यंत ई– समर्थ या प्रणालीद्वारे संलग्नीकरणाचे नुतनीकरण प्रस्ताव सादर करण्यासाठी मुदत वाढ देण्यात येत आहे व त्यानंतर कुठलीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

जर महाविद्यालयांनी १५/१०/२०२६ पर्यंत प्रस्ताव दाखल केले नाही तर अशा महाविद्यालयांचे टप्पाटप्याने असंलग्नीकरण करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर परिपत्रक हे विद्यापीठाच्या www.srtmun.ac.in या संकेतस्थळावर affiliation या शिर्षकांतर्गत प्रसिध्द करण्यात येत आहे.

''ज्ञानतीर्थ'', परिसर,
विष्णुपुरी, नांदेड–४३१ ६०६
जा.क्र.शैक्षणिक/संलग्न–०३/२०२६–२०२७/584
दिनांक :– १२/१०/२०२६

उपकुलसचिव
(संलग्नीकरण विभाग)

**प्रत माहितीस्तव:**
०१. मा. कुलगुरु महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
०२. मा. प्र. कुलगुरु महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.